**प्रशासकीय मान्यता आदेश**

जा.क्र.नियोजन/प्रमा/का-२/डोंविविका/०९-१० /१२५१
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली
दिनांक:- 9/3/2010

विषय :- डोंगरी विभाग विकास कार्यक्रम-२००९-२०१०
प्रशासकीय मान्यता आदेश (आदिवासी क्षेत्र)

संदर्भ :- १) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का-१४८३/दिनांक:-१८ जानेवारी २०१०
२) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं बीजीटी-२००९/प्र.क्र.-२८/का-१४८३दि.२०.६.२००९
३) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं बीजीटी-२००९/प्र.क्र.-२८/का-१४८३दि.१७.११.२००९
४) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं बीजीटी-२००९/प्र.क्र.-२८/का-१४८३दि.२९.१२.२००९

शासन निर्णय नियोजन विभाग क्रं. डोंविका-२००९/प्र.क्र.६/का-१४८३/दिनांक:-१८ जानेवारी २०१० अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी, हिंगोली या आदेशान्वये खालील तक्त्यात वर्णन केलेल्या कामास **खालील अटीवर प्रशासकीय मंजूरी देत आहे.**

१. यंत्रणेने सदरचे काम खात्यामार्फत करावयाचे आहे./ग्रामपंचायत मार्फत करावयाचे आहे.
२. यंत्रणेने या कामाच्या खर्चाचा हिशेब रो.ह.यो.लेखा कार्यपध्दतीप्रमाणे स्वतंत्र ठेवावेत.
३. कार्यकारी यंत्रणेने कामांस प्रशासकीय मंजूरी दिलेल्या रकमेत काम करावे, मंजूरीपेक्षा जास्त खर्च करु नये. अंदाजपत्राकापेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी यंत्रणेची राहील.सदरचे कामांना वितरीत होणारे अनुदान चालू वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी पूर्ण खर्च होईल असे पहावे.
४. अंदाजपत्रकातील कामाच्या वर्णनाप्रमाणे काम दर्जेदार करण्याची जबाबदारी यंत्रणेची राहील.
५. जिल्हाधिकारी यांचेकडे या संबंधी दर महिना अखेर कामाचा प्रगती अहवाल महिन्याचे १० तारखे पर्यंत पाठवावा.
६. मंजूर काम शासकीय/ग्रामपंचायत/नगरपालिका मालकीच्या जागेवर करावे.जागा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.खाजगी संस्था/ सरकारी संस्था/ट्रस्ट यांची कामे घेता येणार नाहीत.
७. कामांचा प्रस्ताव तयार करतांना कामाचे समर्थन, जिल्हास्तरीय कामासाठी जिल्हा नियोजन समितीची मान्यता, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील सूचनांचे अनुपालन झालेले असावे. नसल्यास तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबींची पुन्हा खातरजमा करुन घेण्यांत यावी.
८. मंजूर केलेले काम पूर्ण झाल्यानंतर हे संबंधीत यंत्रणेकडे पुढील देखभालीसाठी हस्तांतरीत करावे व पूर्णत्वाचा व हस्तांतरणाचा दाखला जिल्हाधिकारी यांना सादर करावा. देखभाल व दुरुस्तीसाठी काम ताब्यात घेणार असल्याचे हमीपत्र अगोदरच संबंधितांकडून प्राप्त करुन घेतले नसल्यास ते प्राप्त केल्याशिवाय काम सुरु करु नये.
९. सदरचे काम कार्यवाही यंत्रणे मार्फत आणि जिल्हयातील ईतर यंत्रणे मार्फत अन्य योजनेतुन झालेले नाही अथवा सुरु नाही किंवा मंजूर नाही याची यंत्रणेनी पूर्ण खात्री करुन घ्यावी. तसे प्रमाणपत्र सादर करावे.
१०. या निधीतुन जी बांधकामे हाती घेण्यांत येतील. ती शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवर घेण्यात यावे व त्यावर संबंधीत शासन यंत्रणेची मालकी राहील.
११. <u>या कामावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षातून करावा.</u>

**मागणी क्रमांक ओ-१०,**
**४५५१-डोंगराळ क्षेत्रावरील भाडंवली खर्च -राज्य योजनांतर्गत योजना-६०.**
**इतर डोंगराळ क्षेत्रे (००)(०१),**
**डोंगराळ क्षेत्राकरीता विशेष विकास कार्यक्रम**
**(४५५१ ००११) (योजनांतर्गत)**

१२. सदरील कामांना सक्षम अधिका-यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. असे ग्राहय धरुन प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.
१३. मंजूर केलेल्या बांधकामाचे आकारमान हे प्रशासकिय मंजूरी दिलेल्या नकाशे व अंदाजपत्रकानुसारच कार्यान्वीत करण्यांत यावी. **तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाचे तुकडे पाडुन काम करता येणार नाही व त्यामध्ये फेरबदल करता येणार नाही.**
१४. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदरील काम एक ते दोन वर्कींग सिझनमध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहील.
१५. या कामाचे निरिक्षण व तपासणीचे काम संबंधित स्वतः कार्यकारी अभियंता यांचेकडून आणि जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिका-याकडून अथवा नियोजन विभाग महाराष्ट्र शासन अथवा सार्वजनिक बांधकाम खात्यानी नेमून दिलेल्या अधिका-यांकडून होऊ शकेल.
१६. प्राथमिक शाळेच्या खोल्याचे बांधकाम शासनांनी विहीत केलेल्या टाईप डिझाईन नुसारच करावयाचे असून विहित आर्थिक मर्यादेतच खर्च करावयाचा आहे.
१७. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदरचे काम पूर्ण होताच कामाच्या दर्शनी भागावर आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यांत आलेल्या कामाचे नाव,वर्ष व खर्च लिहावा.

... सन २००९-२०१० साठी डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध झालेल्या निधीतून खालील रुपये ९.९२ लाखाच्या एका कामांना प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

## डोंगरी विभाग विकास कार्यक्रम २००९-१०

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किमंत (रु.लाखात) | प्रशासकीय मान्यता किमंत (रु.लाखात) | कार्यान्वयीन यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | उपगट-हिंगोली | | | |
| १ | गौ.गोरेगाव ता.सेनगाव ते गोटेवाडी जोडरस्त्याचे बांधकाम करणे | १०.०० | ९.९२ | कार्यकारी अभियंता सा.बां.वि.हिंगोली |
| | एकूण :- | १०.०० | ९.९२ | |

(अक्षरी रुपये नऊ लक्ष ब्यान्नव हजार फक्त)

स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती,हिंगोली करिता

टिपः- १) वर नमूद केलेल्या कामास देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता मागील पृष्ठावरील अनुक्रमांक १ ते १७ या अटीच्या अधिन राहून दिलेली आहे. या अटीपैकी ज्या ठिकाणी विशिष्ट कागदपत्राची पूर्तता करुन घेणे आवश्यक आहे. त्या कागदपत्राची/परवानगीची पूर्तता करुन घेऊन तसेच एल सेक्शन मध्ये ग्रेडीएन्ट नमूद करण्यात यावे व नंतरच प्रत्यक्ष कामे सुरु करण्यात येईल **या अटीवरच मंजूरी देण्यात येत आहे.**

प्रत :-१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
२) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी,हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
३) मा.आ.श्री.भाऊराव पाटील गोरेगावकर,विधान सभा सदस्य हिंगोली,यांना माहितीस्तव

स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती,हिंगोली करिता